# बेपत्ता

एक कविता माझी बेपत्ता झाली
सर्वत्र शोधाशोध केली
परी ना कोठे सापडली
पोलिसांत तक्रार नोंदवली
परी ना कोठे सापडली
पोलिसांनी शोधाशोध केली
परी ना त्यांच्या हाती गवसली
संशयितांची यादी तयार झाली
पेपरांतही हरवल्याची बातमी आली
ला पता झाली; मला काळजी लागली
काय झालं असेल तिचं ?
ती हरवली, पळविली का तिने आत्महत्या केली ?
ती नाहीशी झाली अन् माझी झोप उडाली
शोधून दमलो थकलो; मला डुलकी लागली
हसण्याच्या आवाजाने मला जाग आली
उठून पाहिले इकडे तिकडे चोहिकडे
परी कविता दिसली ना कोठे
हास्य मधुर ऐकू आले
हृदयात जागा देशील का ? शब्द कानी पडले
कविता होती हृदयात माझ्या दडलेली
अशी ती मला अचानक सापडली !

■

**– पद्माकर चित्रे**

**('शब्दांची फुलपाखरे' या कवितासंग्रहातून)**